## गैरअर्जदारांतर्फे उर्वरीत उलटतपास– श्री. राहूल पाटील वकील.

**२५**. गैरअर्जदार पुर्वीपासून आमच्या नात्यातील आहेत. माझे वडिल हे सचिनचे मामा आहेत. मला लग्नापूर्वीपासून सचिन कामोटे येथे राहत असल्याची माहिती होती. मला लग्नापूर्वी पासून सचिनच्या एकत्र कुटुंबा सोबत राहायचे असल्याची माहिती होती. मी लग्नानंतर सचिन सोबत कामोटे येथे राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी लग्नानंतर तीन ते चार महिन्यांनी सासरचे घर सोडून जाण्याची इच्छा व्यक्त केली होती.

**२६.** मी लग्नानंतर सचिन सोबत भांडणे झाल्यानंतर माहेरी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.१०.१०.२०१४ रोजी माहेरी येण्याचा हट्ट करुन भांडणे केली होती. हे म्हणणे खरे नाही की, सचिनने मला माहेरी जाणे योग्य नसल्याचे समजावून सांगितल्यामुळे मी त्याला स्वतःला दुखापत करुन घेण्याची धमकी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि.१७.१०.२०१४ रोजी मी सचिन सोबत भांडणे केल्यावर माझ्या भावासोबत पुण्याला निघून आले होते. साक्षीदार स्वतःहून सांगते, तिला गैरअर्जदारांनी हकलून दिल्यामुळे पुणे येथे भावांकडे जावे लागले होते. मी गैरअर्जदारांनी मला कोणत्या तारखेला हकलून दिले याची निश्चित तारीख सांगू शकत नाही.

**२७**. मी आठ दिवस पुणे येथे भावांकडे राहिल्यानंतर गावी माहेरी आले होते. मी दि. १७.१०.२०१४ रोजी पासून दि.२०.०२.२०१५ पर्यंत पुणे व माहेरी राहिले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या कालावधीत माझा गर्भपात झाला होता. मी माझा गर्भपात झाल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा अर्जासोबत दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या गर्भपातास गैरअर्जदार जबाबदार असल्याचे मी खोटे सांगत आहे. मी वरील कालावधीत माहेरी राहत असताना आमची माझ्या चुलत्यांच्या घरी बैठक झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या बैठकीत सचिन सोबत स्वतंत्र राहण्याची मागणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मागणी नंतर सचिनने दि.३१.१२.२०१४ रोजी नवीन घर खरेदी केले होते.

**२८**. मी व सचिन दि.०४.०४.२०१५ रोजी पासून नवीन घरात स्वतंत्र राहत

होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्या घरात राहत असताना माझा दुस–या वेळेस गर्भपात झाला होता. मला त्या घरातून दि.३०.०६.२०१५ रोजी सचिनने हकलून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी देखील मी माझ्या भावांच्या संपर्कात असून ते मला घेऊन जाण्यासाठी आले होते. मी पहिल्या गर्भपातानंतर मे–२०१५ मध्ये गर्भवती राहिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.३०.०६.२०१५ रोजी स्वतःहून सामान घेऊन भावा सोबत पुण्याला निघून गेली होती. मी जून–२०१५ ते नोव्हेंबर–२०१८ पर्यंतच्या काळात सचिन सोबत राहिलेली नाही. मी दोन वेळा मला घरातून हकलून दिल्याबाबत पोलिसांकडे तक्रार दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही घटना घडलेली नसल्यामुळे मी त्याबाबत पोलिसांकडे तक्रार दिलेली नाही.

**२९**. दि.२८.०१.२०१६ रोजी स्वयम चा जन्म झाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मुलाच्या जन्माची माहिती सचिनला कळवली नव्हती. मी स्वयम चा जन्म झाल्यानंतर सचिनला फोन केला होता. मी त्याबाबतचा पुरावा अर्जासोबत दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सचिन व सासू शशिकला यांनी बाहेरुन मुलाच्या जन्माची माहिती मिळाल्यामुळे ते मला भेटण्यासाठी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, ते भेटण्यास आल्यावर मी त्यांना मुलाला भेटू दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी आणलेल्या भेटवस्तू मी स्विकारुन काही दिवसांनी परत केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी सचिनने मला पुन्हा नांदायला येण्यास विचारल्यावर मी नकार दिला होता.

**३०**. मला सचिनने वकिलां मार्फत दि.१०.१०.२०२२ रोजी नांदायला येण्याबाबत नोटीस दिलेली आहे. मी त्या नोटीसीला उत्तर दिलेले आहे. मी नोटीसीला उत्तर दिल्यानंतर सचिनने पनवेल न्यायालयात नांदायला येण्याबाबतचा दावा दाखल केला होता. मी त्या दाव्यात नोटीस मिळाल्यानंतर हजर होऊन लेखी म्हणणे दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यामध्ये सचिन सोबत नांदायची इच्छा नसल्याचे कथन केले आहे. सचिनने तो दावा काढून घेऊन माझ्या विरोधात पनवेल न्यायालयात घटस्फोटाचा दावा दाखल केला आहे. त्यानंतर मी सदरची

तक्रार दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला सचिन सोबत कामोटे मुंबई येथे राहायचे नसल्यामुळे मी माहेरी येऊन सदरची खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी शपथपत्रात गैरअर्जदारांनी केलेल्या हिंसाचाराचे कथन केलेले नाही.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक - ०८.०६.२०२६.

(आर. पी. थोरे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.